Maharashtra Times - 27 Feb, 2016

# ग्रंथ महोत्सवात सवलती

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५२व्या दीक्षान्त समारंभानिमित्त सलग दहाव्या वर्षी आयोजित केलेल्या 'ग्रंथ महोत्सव - २०१६'चे उदघाटन शुक्रवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या लोककला केंद्रासमोरील प्रांगणात ग्रंथ महोत्सव भरविला आहे. यावर्षी ५० हून अधिक प्रकाशक, विक्रेते महोत्सवात सहभागी आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते बॅ. बाळासाहेब खर्डेकर व डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पूजन झाले. काही प्रकाशकांनी २० ते ३० टक्क्यांपर्यंत सवलतीच्या दरात पुस्तके उपलब्ध करुन दिली आहेत. ग्रंथमहोत्सव २८ फेब्रुवारीपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत सुरु राहणार आहे. उद्घाटनानंतर राष्ट्रीय अंध संघटनेतर्फे (नॅब, कोल्हापूर) अंध विद्यार्थ्यांच्या वाद्यवृंदाचा 'ऑर्केस्ट्रा आयडियल स्टार्स' हा सांस्कृतिक कार्यक्रम लोककला केंद्रात झाला.

अर्जुन टकळकर




शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी ग्रंथ महोत्सवाला सुरूवात झाली.

यावेळी अनिता शिंदे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, नॅबचे कोल्हापूरचे संचालक डॉ. एम. बी. डोंगरे, डॉ. एन. बी. शेख, वाद्यवृंद संयोजक दीपक कारंजकर उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी स्वागत केले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंतीचे औचित्य साधून विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत १२५ विद्यार्थिनींचा सहभाग असणारे विशेष निर्भया अभियान शुक्रवार पासून सुरु झाले. या अभियानाअंतर्गत विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात येणार आहेत. विद्यार्थिनींनी काही प्रात्यक्षिकेही सादर केली.

## 'कॅरी बॅग'ला पर्याय 'सारी बॅग'चा!

'ग्रंथ महोत्सवामध्ये शाहू महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटमार्फत एक लक्षवेधी स्टॉल लावण्यात आला आहे. यामध्ये विद्यार्थिनींनी जुन्या साड्यांपासून बनविलेल्या सारी बॅग विक्रीसाठी ठेवल्या आहेत. प्लास्टीक कॅरी बॅगला सारी बॅग हा उत्तम व पर्यावरणपूरक पर्याय असून प्रदर्शनात सहभागी प्रकाशकांनी, ग्राहकांनी पुस्तकांसाठी कॅरी बॅगऐवजी येथील सारी बॅग आवर्जून वापराव्यात', असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.